
THANE POLICE
COMMISSIONERATE
गुन्हे अन्वेषण विभाग
घटक-१,ठाणे
CRIME BRANCH
UNIT-1, THANE

# गुन्हे शाखा, घटक—१, ठाणे शहर.

दुरध्वनी कमांक—०२२२५३४३५६५, **Email** - *cp.thane.thanecrime@mahapolice.gov.in*


" प्रेसनोट " दिनांक- १५/०२/२०२१

**" १ वर्षापुर्वी खुनाच्या प्रयत्नात वापरलेले पिस्टल पुरविणा-या आरोपीतास ७ माऊजर पिस्टल, २ मॅगझीन ,२० जिवंत काडतुसे याचेसह अटक.**
**गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी "**

---- ooooo ----

दिनांक-१४/०२/२०२१ रोजी पहाटे ०६.०० वा. चे सुमारास महालक्ष्मी मंदीराचे लगतच्या रोडवर, साकेत, ठाणे पश्चिम येथे इसम नामे कैलाससिंग महेंदसिंग चावला, राह. मध्यप्रदेश हा गावठी बनावटीची माऊजर पिस्टल विकी करण्याकरीता येणार असल्याची बातमी गुन्हे शाखा, घटक १, ठाणे ला मिळाली.

नमुद बातमीचे अनुषंगाने मा.वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाखाली कारवाई करणे करीता दोन पथके नेमण्यात आली . सदर पथकांनी कारवाई करुन इसम नामे कैलाससिंग महेंदसिंग चावला,वय २७ वर्षे रा.मु.पो.गांधवानी ता. गांधवानी,जि. धार, राज्य मध्यप्रदेश यांस साकेत रोड, ठाणे येथून ताब्यात घेवून त्याचे ताब्यात असलेल्या बॅगेची झडती घेतली असता त्यामध्ये एकूण ७ माऊजर पिस्टल, २ मॅगझीन, २० जिवंत काडतुसे असे रुपये १,८८,७५० किं.ची अग्निशस्त्रे हस्तगत करण्यात आली आहेत. सदर इसमाविरुध्द् राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ३४/२०२१, भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह म.पो.का.क ३७(१) (३) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीची दिनांक-१९/०२/२०२१ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

नमुद आरोपीत याचेकडे केलेल्या चौकशीमध्ये तो विठठलवाडी पोलीस स्टेशन, गु.रजि.नं. २६६/२०२०, भादवि कलम ३०७, ३४ सह आर्म ॲक्ट ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), १३५ प्रमाणे दाखल गुन्हयात पाहीजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.विवेक फणसळकर, पोलीस सह आयुक्त डॉ. श्री. सुरेश कुमार मेकला, मा. अप्पर पोलीस आयुक्त ,गुन्हे श्री.संजय येनपुरे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. लक्ष्मीकांत पाटील, मा. सहा. पोलीस आयुक्त (शोध-१) गुन्हे श्री. किसन गवळी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक कृष्णा कोकणी, सहा.पोलीस निरीक्षक प्रफुल्ल जाधव, संदीप चव्हाण, पो.उप.नि/दत्तात्रय सरक, कैलास सोनावणे, पोहवा/रविंद्र पाटील, रविंद्र काटकर, पोना/संजय बाबर, चंद्रकांत वाळुंज, अजय साबळे, रिझवान सैय्यद, तौसिफ पठाण, दादासाहेब पाटील, अमोल देसाई, राहुल पवार, पोशि/गणेश बडगुजर, भगवान हिवरे या पथकाने केली आहे.

---- ooooo ----